नवराष्ट्र
www.navarashtra.com

**कौतुकास्पद • अमरावती येथे ईसीई सेवा ऊर्जा पुरस्कार वितरणाचे; सांस्कृतिक भवन येथे आयोजन**

# शिशुगृह, गायत्री बालिकाश्रमाला पुरस्कार

**सामाजिक**

**अमरावती,** ब्युरो. समाजासाठी कार्य करणारे व्यक्ती व संस्थांना आधार, प्रोत्साहन देण्याकरिता ईसीई इंडिया कंपनीद्वारे मानवसेवा ऊर्जा पुरस्काराचा संस्कार जोपासला जात आहे. कंपनीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे ईसीई सेवा ऊर्जा पुरस्कार वितरणाचे आयोजन करण्यात आले होते.

सौरउर्जा क्षेत्रात नावलौकीक असलेली ईसीई मानव सेवा उर्जा पुरस्कारद्वारे सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे प्रेरणादायी कार्य करीत आहे. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून हेमलकसा लोकबिरादरीचे सेवाकरी, मार्गदर्शक पद्मश्री प्रकाश आमटे, मंदाकिनी आमटे यांच्यासह अध्यक्ष म्हणून नीलेश साठे उपस्थित होते. अतिथी म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिकाश्रमचे सचिव गणेश काळकर, सहसचिव सुधाकर गीते ईसीई इंडियाचे संस्थापक अध्यक्ष अनंत कौलगीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. यानंतर समाजाकरिता समर्पित जीवन जगणारे पद्मश्री प्रकाश व मंदाकिनी आमटे व व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिकाश्रम अकोला संस्थेला ईसीई फाउंडेशनचा तिसरा सेवा ऊर्जा पुरस्कार-2024 ने सन्मानित करण्यात आले. प्राचार्य अविनाश मोहरील यांनी साधलेल्या विशेष मुलाखतीमध्ये पद्मश्री प्रकाश व मंदाकिनी आमटे यांनी साधलेल्या संवादातून जगण्याचा मुलमंत्र समाजाला दिला. आयुष्याच्या 75 वर्षांच्या वाटचालीचे अनुभव सांगतांना पद्मश्री प्रकाश आमटे म्हणाले, आयुष्यामध्ये समोर आलेल्या परिस्थितीला स्वीकारून त्यामध्ये समाजाभिमुख बदल करण्यावर भर दिला. शिक्षणानंतर वैद्यकीय सेवेचे व्रत जोपासताना समाजसेवेला प्राधान्य दिले. या सेवाकार्यामध्ये साथ मिळाली ती मंदाकिनी यांची. शिक्षणानंतर उज्ज्वल भवितव्याची स्वप्न साकारताना समाजसेवेचे व्रत स्वीकारत मंदाकिनी यांनी दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या उत्थानाकरता पुढाकार घेतला. समाजसेवेचे व्रत जोपासताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. तब्बल 22 वर्ष त्या भागामध्ये वीज, रस्ते नव्हते. अशा परिस्थितीमध्ये स्वतःला आनंदी आणि समाधानी ठेवत सेवाकार्य सुरू ठेवले. लोकं जुळत गेली आणि सेवाकार्याला संस्थेच्या स्थापनेतून एक मुर्त स्वरूप प्राप्त झाले. आज वर्षाला 4 लाखांपेक्षा अधिक आदिवासी बांधवांना आरोग्य सेवा देताना तिसऱ्या पिढीचा सहभाग जीवनात जोपासलेल्या सेवा कार्याचा आनंद आणि समाधान असल्याचे प्रेरणादायी मत पद्मश्री प्रकाशबाबा व मंदाकिनी आमटे यांनी उपस्थितांना दिला. संचालन प्राजक्ता राऊत यांनी तर आभार अनिकेत तोंडरे यांनी मानले. पुरस्कार सोहळ्याचा समारोप पसायदानाने झाला. कार्यक्रमाला समाजातील सर्व क्षेत्रातील मान्यवर तसेच स्थानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## 'यांना' करण्यात आले सन्मानित

या सत्कार सोहळ्यामध्ये कंपनीच्या विविध विभागातील उत्कृष्ट सेवा देणारे प्रज्वल माकोडे, धनंजय कांडलकर, चंद्रशेखर मोहोड, महेंद्र रामटेके, अमित उजवणे, शेखर जोशी, विशाल मोपारी, सुमेध वीर, नीलेश तायडे, किशन पांडे, रवींद्र सोनोने, शैलेश नागुडे, अतुल रंगीरे, अनिता उखडे, प्रीतम हिंवे, सेजल मते यांचा नव उर्जा सेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2024-12-16 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# पद्मश्री प्रकाश-मंदाकिनी आमटेंनी उलगडला प्रवास

## ईसीई फाऊंडेशनचा 'ऊर्जोत्सव' कार्यक्रम

◆ **अमरावती १५ डिसेंबर**

प्राचार्य अविनाश मोहरील यांनी घेतलेल्या विशेष मुलाखतीतून पद्मश्री डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांनी जगण्याचा मूलमंत्र समाजाला दिला. आयुष्याच्या ७५ वर्षांची वाटचालीचा प्रवास त्यांनी उपस्थितांसमोर उलगडला.

ईसीई इंडिया कंपनीद्वारे ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे मानवसेवा ऊर्जा पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी आयोजिण्यात आला होता. त्यावेळी ही प्रगट मुलाखत झाली. अनुभव सांगताना पद्मश्री प्रकाश आमटे म्हणाले, आयुष्यामध्ये समोर आलेल्या परिस्थितीला स्वीकारून त्यामध्ये समाजाभिमुख बदल करण्यावर भर दिला. शिक्षणानंतर वैद्यकीय सेवेचे व्रत जोपासताना समाजसेवेला प्राधान्य दिले. या सेवाकार्यामध्ये साथ मिळाली ती मंदाकिनी यांची. शिक्षणानंतर उज्ज्वल भवितव्याची स्वप्न साकारताना, समाजसेवेचे व्रत स्वीकारत मंदाकिनी यांनी दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या उत्थानाकरिता पुढाकार घेतला.



मंचावर उपस्थित डॉ. प्रकाश व मंदाकिनी आमटे

अनेक अडचणींचा समाना करावा लागला. तब्बल २२ वर्षे त्या भागामध्ये वीज, रस्ते नव्हते. अशाही परिस्थितीमध्ये स्वत:ला आनंदी आणि समाधानी ठेवत सेवा कार्य सुरू ठेवले. लोकं जुळत गेली आणि सेवाकार्याला संस्थेच्या स्थापनेतून एक मूर्त स्वरूप प्राप्त झाले. आज वर्षाला ४ लक्षांपेक्षा अधिक आदिवासी बांधवांना आरोग्य सेवा देताना तिसऱ्या पिढीचा सहभाग समाधान देतो असे आमटे दाम्पत्याने सांगितले.

यावेळी एलआयसीचे प्रबंध संचालक निलेश साठे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिकाश्रमचे सचिव गणेश काळकर, सहसचिव सुधाकर गीते, अनंत कौलगीकर, कंपनीचे संचालक अमित आरोकार आदी मान्यवर उपस्थित होते.

तत्पूर्वी अन्य मान्यवरांची भाषणे झाली. या सत्कार सोहळ्यामध्ये ईसीई कंपनीच्या विविध विभागांतील उत्कृष्ट सेवा देणारे प्रज्वल माकोडे, धनंजय कांडलकर, चंद्रशेखर मोहोड, महेंद्र रामटेके, अमित उजवणे, शेखर जोशी, विशाल मोपारी, सुमेध वीर, निलेश तायडे, किशन पांडे, रवींद्र सोनोने, शैलेश नागुडे, अतुल रंगीरे, अनिता उखडे, प्रीतम हिवे, सेजल मते यांचा नवउर्जा सेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्राजक्ता राऊत यांनी तर आभार अनिकेत तोंडरे यांनी मानले. पुरस्कार सोहळ्याचा समारोप पसायदानाने झाला.

कार्यक्रमाला समाजातील सर्व क्षेत्रांतील मान्यवर नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

हिंदुस्थान
भारतीय सौर ३० मार्गशिष १९४६
द्वितीय मुखपृष्ठ
epaper : dainikhindusthan.com
email : dainikhindusthan@gmail.com
twitter : twitter.com/HindusthanAmt
अमरावती, रविवार १५ डिसेंबर, २०२४

सुप्रभात

**सुविचार**
गरिबी असूनही दान करतो तो खरा दानशूर.

**अमरावती हवामान**
रविवारचा अंदाज
कमाल : २७ किमान १३

| | |
|---|---|
| नागपूर | : कमाल २६ किमान १३ |
| पुणे | : कमाल २८ किमान १३ |
| मुंबई | : कमाल ३१ किमान २३ |
| अकोला | : कमाल २७ किमान १२ |
| यवतमाळ | : कमाल २६ किमान १३ |
| वाशीम | : कमाल २७ किमान १३ |

# पद्मश्री प्रकाश-मंदाकिनी आमटेंच्या सेवाकार्याचा 'उर्जोत्सव'

## ईसीई फाऊंडेशनचा सेवा उर्जा पुरस्कार २०२४ उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिकाश्रमला



अमरावती दि.१४ : सौर उर्जा क्षेत्रात नावलौकीक असलेली ईसीई मानव सेवा उर्जा पुरस्कार द्वारे सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे प्रेरणादायी कार्य करीत आहे. चार मित्रांनी सुरु केलेली ईसीई कंपनी औद्योगिक, व्यवसायिक क्षेत्रात भरभराट साधत असतांना स्थानिकांना रोजगार आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य समाजामध्ये एक नवीन आदर्श निर्माण करीत आहे. समाजाकरीता कार्य करणारे व्यक्ती व संस्थांना आधार, प्रोत्साहन देण्याकरीता ईसीई इंडिया कंपनीद्वारे मानवसेवा उर्जा पुरस्काराचा संस्कार जोपासल्या जात आहे. कंपनीच्या १५ व्या वर्धापण दिनाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर सांस्कृतीक भवन येथे ईसीई सेवा उर्जा पुरस्कारचे आयोजन करण्यात आले होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी हेमलकसा लोक बिरादरीचे सेवाकरी मार्गदर्शक पद्मश्री प्रकाश आमटे, मंदाकिनी आमटे यांच्यासह अध्यक्ष म्हणुन निलेश साठे उपस्थित होते. प्रमुख अतिथींमध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिकाश्रम चे सचिव गणेश काळकर, सहसचिव सुधाकर गोते ईसीई इंडिया फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनंत कौलगीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलनाने झाली. यानंतर समाजाकरीता समर्पित जीवन जगणारे पद्मश्री प्रकाश व मंदाकिनी आमटे व व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्याहस्ते उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालीकाश्रम अकोला संस्थेला ईसीई फाऊंडेशनचा तिसरा सेवा उर्जा पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले.

प्राचार्य अविनाश मोहरील यांनी साधलेल्या विशेष मुलाखती मध्ये पद्मश्री प्रकाश व मंदाकिनी आमटे यांनी साधलेल्या संवादातून जगण्याचा मुलमंत्र समाजाला दिला. आयुष्याच्या ७५ वर्षांची वाटचालीचे अनुभव सांगतांना पद्मश्री प्रकाश आमटे म्हणाले, आयुष्यामध्ये समोर आलेली परिस्थितीला स्विकारून त्यामध्ये समाजाभिमुख बदल करण्यावर भर दिला. शिक्षणानंतर वैद्यकीय सेवेचे व्रत जोपासतांना समाजसेवेला प्राधान्य दिले. या सेवाकार्यामध्ये साथ मिळाली ती मंदाकिनी यांची. शिक्षणानंतर उज्वल भवितव्याची स्वप्न साकारतांना समाजसेवेचे व्रत स्विकारत मंदाकिनी यांनी दुर्गम भागातील आदीवासी बांधवांच्या उत्थानाकरीता पुढाकार घेतला. समाजसेवेचे व्रत जोपासतांना अनेक अडचणींचा समाना करावा लागला. तब्बल २२ वर्ष त्या भागामध्ये वीज, रस्ते नव्हते. अशाची परिस्थितीमध्ये स्वतःला आनंदी आणि समाधानी ठेवत सेवा कार्य सुरू ठेवले. लोकं जुळत गेली आणि सेवाकार्याला संस्थेच्या स्थापनेतून एक मुर्त स्वरूप प्राप्त झाले. आज वर्षाला ४ लख पेक्षा अधिक आदीवासी बांधवांना आरोग्य सेवा देतांना तिसऱ्या पीढीचा सहभाग जीवनात जोपासलेल्या सेवा कार्यांचा आनंद आणि समाधान असल्याचे प्रेरणादायी मत पद्मश्री प्रकाशबाबा व मंदाकिनी आमटे यांनी उपस्थितांना दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हर्षवर्धन देशमुख यांनी म्हणाले, औद्योगिक क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या ईसीई इंडिया कंपनी व फाऊंडेशन समाजसेवा संकल्प प्रेरणादायी आहे. लोकशिक्षक संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा समाजामध्ये प्रवाहीत करून सेवाकार्यांची प्रेरणाज्योत अविरत तेवती. तीच प्रेरणा अमरावतीचा संस्कार झाल्याची अनुभूती आजच्या पुरस्कार सोहळ्यातून होत आहे. ही केवळ सुरूवात असून अनेक व्यक्तीमत्व आणि संघटना पापुढे असे सामाजिक बांधिलकी जोपासणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष निलेश साठे म्हणाले, औद्योगिक क्षेत्राची चौकटीला नवीन संस्कार देणारा हा सोहळा खऱ्या अर्थाने लोकसेवेची मुहूर्तमेढ रोवणारा आहे. समाजसेवा सर्वाधिक कठीण व्रत आहे. संत गाडगेबाबा, तपोवन चे संस्थापक डॉ. शिवाजीराव पटवर्धन, भाऊसाहेब देशमुख यांच्या लोकसेवेतून आणि पद्मश्री प्रकाशबाबा-मंदाकिनी आमटे यांच्या समाजसेवेतून जाणीव होते. हेच संस्कार व्रत औद्योगिक क्षेत्रातील ईसीई इंडिया कंपनी जोपासत असून ही प्रेरणा समाजाला नवी दृष्टी, दिशा देणारी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

ईसीई इंडिया कंपनीचे संस्थापक अध्यक्ष अनंत कौलगीकर यांनी प्रास्ताविकेच्या माध्यमातून कंपनीचे ध्येय धोरण, सेवाकार्य, प्रगती आदी बाबत माहिती दिली. या सत्कार सोहळ्यामध्ये कंपनीच्या विविध विभागातील उत्कृष्ट सेवा देणारे प्रज्वल माकोडे, धनंजय कांडलकर, चंद्रशेखर मोहोड, महेंद्र रामटेके, अमीत उजवणे, शेखर जोशी, विशाल मोघारी, सुमेध वीर, निलेश तायडे, किशन पांडे, रविंद्र सोनोने, शैलेश नागुडे, अतुल रंगीरे, अनिता उखडे, प्रीतम हिवे, सेजल मते यांचा नव उर्जा सेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्राजक्ता राऊत यांनी तर आभार अनिकेत तोंडरे यांनी मानले. पुरस्कार सोहळ्याचा समारोप पसायदानाने झाला. कार्यक्रमाला समाजातील सर्व क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ईसीई फाउंडेशन ने किया सम्मानित, बेहतरीन कार्य करने वाले कर्मचारियों को भी पुरस्कार प्रदान

# उत्कर्ष शिशुगृह व गायत्री बालिका आश्रम को मानवसेवा ऊर्जा पुरस्कार






**प्रकाश आमटे, हर्षवर्धन देशमुख व नीलेश साठे की उपस्थिति**





# अकोला की उत्कर्ष संस्था को ईसीई इंडिया का मानव सेवा पुरस्कार




**शहर भास्कर | अमरावती.** विदर्भ की प्रथम सोलर पैनल उत्पादक कंपनी ईसीई इंडिया अमरावती द्वारा शनिवार की शाम संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन में आयोजित सम्मान समारोह में अकोला की उत्कर्ष शीशुगृह तथा गायत्री बालिकाश्रम संस्था को पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे के हाथों इस वर्ष के मानव सेवा ऊर्जा पुरस्कार से सम्मानित किया गया। संस्था के सचिव गणेश कालकर और सुधाकर गीते ने संस्था सदस्यों के साथ यह पुरस्कार स्वीकार किया। चेक, स्मृति चिह्न और मानपत्र ऐसा इस पुरस्कार का स्वरूप है। इस अवसर पर डॉ. प्रकाश आमटे और डॉ. मंदाकिनी आमटे इनका शिवाजी शिक्षा संस्था के अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, सम्मान समारोह के अध्यक्ष तथा एलआईसी इंडिया के प्रबंध संचालक नीलेश साठे, ईसीई इंडिया के मैनेजिंग डायरेक्टर अमित आरोकर के हाथों अमृत महोत्सवी सम्मान भी किया गया। इसी के साथ ही कंपनी के होनहार कर्मी-अधिकारियों को भी सेवा ऊर्जा पुरस्कार से सम्मानित किया गया।

## आमटे दंपति का किया अमृत महोत्सवी सम्मान

### पूरे देश में विस्तार : आरोकर

कार्यक्रम की प्रास्तावना में संचालक अमित आरोकर ने बताया कि, वर्ष 2010 में स्थापित कंपनी ने अब पूरे देश में अपना विस्तार किया है। हर वर्ष कंपनी के स्थापना दिन कार्यक्रम में कंपनी अपने होनहार अधिकारी-कर्मियों को सेवा ऊर्जा पुरस्कार से सम्मानित करती है। उसी प्रकार विभिन्न सेवा कार्यों में भी योगदान देती है। इसी श्रृंखला में प्रति वर्ष सामाजिक क्षेत्र में कार्यरत समाजसेवी संस्था का सम्मान कर उनके सामाजिक कार्यों का गौरव करती है। उन्होंने कंपनी की अब तक की यात्रा और कार्य पद्धति पर भी विस्तार से प्रकाश डाला। इस अवसर पर उद्योजक संजय जाधव, विलास मराठे, ईसीई इंडिया के संचालक समीर काले, अनिकेत तोडारे, श्रीकांत तिखिले, सूरज गावंडे, प्रवीण वानखडे, अनंत कौलगीकर, पूर्व सांसद अनंत गुढे, शरद देवरणकर, दिनकर अंबुलकर, जयंत पुसदकर, गोविंद रोहणकर तथा अन्य प्रतिष्ठित नागरिक बड़ी संख्या में उपस्थित थे।

सकाळ

# अनाथांचे आधारवड उत्कर्ष शिशूगृहाचा सन्मान

## ईसीई सेवा ऊर्जा पुरस्कार : पद्मश्री डॉ. विकास आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे यांची उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. १४ : रस्त्यावर, कचऱ्याच्या कुंडीत, रेल्वेस्टेशनवर अक्षरशः फेकून दिलेल्या अनाथ बालिकांना नवे जीवन देऊन त्यांच्या आयुष्यात सोनेरी पहाट आणणाऱ्या अकोला येथील उत्कर्ष शिशूगृह व गायत्री बालिकाश्रमाच्या कार्याचा आज (ता.१४) अमरावतीत गौरव करण्यात आला. ईसीई इंडिया फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या ईसीई सेवा ऊर्जा पुरस्काराने उत्कर्ष शिशूगृहाला सन्मानित करण्यात आले. येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात आयोजित सोहळ्यात पद्मश्री डॉ. विकास आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

एलआयसीचे माजी प्रबंध संचालक नीलेश साठे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, व्यवस्थापकीय संचालक अमित आरोकर, ईसीईचे सचिव अनंत कौलगीकर, उत्कर्ष शिशूगृहाचे सचिव गणेश काळकर, सहसचिव सुधाकर गीते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात अमित आरोकर यांनी ईसीई इंडिया कंपनीच्या स्थापना तसेच सामाजिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. अनाथांचा सांभाळ करणाऱ्या उत्कर्ष संस्थेसारखे कार्य करणाऱ्यांची आज समाजाला खरी गरज आहे. डॉ. विकास आमटे यांनी हेमलकसा प्रकल्पाच्या माध्यमातून समाजाला एक नवीन दिशा दिली, अशा शब्दात हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष नीलेश साठे यांनीसुद्धा ईसीई फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी उत्कर्ष शिशूगृहाच्या संचालकांना एक लाखाचा धनादेश तसेच मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. प्रकाश आमटे यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मानचिन्ह देऊन त्यांचासुद्धा गौरव करण्यात आला. याप्रसंगी ईसीई इंडिया कंपनीचे संचालक समीर काळे, अनिकेत तोंडारे, सूरज गावंडे, श्रीकांत तिखीले, कार्यकारी संचालक राहुल जगताप यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्राजक्ता राऊत यांनी केले. आभार अमित आरोकर यांनी मानले. कार्यक्रमाला ईसीई इंडियाचे संचालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



अमरावती : उत्कर्ष शिशूगृहाचा सन्मान करताना पद्मश्री डॉ. विकास आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे व अन्य मान्यवर.

### अन् उपस्थितांचे डोळे पाणावले

पुरस्कार वितरण सोहळ्यात अकोला येथील उत्कर्ष शिशूगृह व गायत्री बालिकाश्रमाच्या कार्याची दखल घेणारी चित्रफित मोठ्या स्क्रिनवर दाखविण्यात आली. त्याधील अनाथ मुलींचे आनंदमय जीवन व त्यांच्या शिक्षणासंबंधातील वृत्त पाहताच सभागृहात उपस्थित अनेकांचे डोळे पाणावले.

### प्रकट मुलाखतीतून उलगडले अनेक पैलू

सत्कार सोहळ्यानंतर पद्मश्री डॉ. विकास आमटे व त्यांच्या सहचारिणी डॉ. मंदाकिनी आमटे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी ती मुलाखत घेतली. या मुलाखतीच्या माध्यमातून डॉ. प्रकास आमटे तसेच त्यांच्या समाजकार्याचे विविध पैलू उलगडण्यात आले.